# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 04/01/2023 (बुधवार) दुपार


### गैरकायदयाची मंडळी

पो.स्टे. कुही :— अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील मौजा मांढळ येथे दिनांक ०२/०१/२०२३ चे २१.०० वा. सुमारास यातील फिर्यादी नामे— गोपीचंद भगवान सोनकुसरे, वय ५३ वर्ष, रा. मांढळ व आरोपी नामे— १)स्वप्नील राउत २) मधुकर बारई ३) राजु तिवसकर ४) भार्गव तिवसकर ५) लक्ष्मण सातपैसे ६) वसंता ठाकरे ७) रामकृष्ण निळगुळकर ८) संजय निळगुडकर ९) कृणाल वाघमारे १०) सचीन लांजेवार ११) नितीन लांजेवार सर्व रा. मांढळ हे एकाच गावातील असुन ते एकमेकांना ओळखतात. आरोपीची पत्नी सौ. मिना बारई ही ग्रामपंचायत मांढळ येथुन वार्ड नं. ५ मधुन निवडुन आली आहे. दि. ०२/०१/२३ रोजी रात्री ०९.०० वा. दरम्यान फिर्यादी हा आपले घरी हजर असतांना यातील आरोपी सर्व मिळुन आले व फिर्यादीने आरोपी मधुकर बारई याचे पत्नीला अश्लील शब्दात बोलल्याचे कारणावरून आरोपीतांनी फिर्यादीचे घरात घुसुन अश्लील शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— गोपीचंद भगवान सोनकुसरे वय ५३ रा. माढळ यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपी विरुध्द कलम ४५१, ३२३, १४३, १४७, ५०४, ५०६ भा.द.वि. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील सदर आरोपी क्र. १) ३) ४) ६) ८) १०) ११) यांना अटक करण्यात आली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार ब. नं. ३६४ सुधीर मो. नं. ८६९८४०७११४ करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर